रेग्युलर दिवाणी दावा क्र.४३९/२०१६
बशीर वि. नाजम व इतर
नि.क्र.७२/ क (सोबत)

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.१</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. जी.व्ही. कोदळे यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे आजोबा ईस्माइल यांना हैदर, महेबुब व दादेभाई असे तीन मुले होती. हे म्हणणे खरे आहे की, हैदर याना दोन मुली होत्या. हे म्हणणे खरे आहे की, महेबुबला मुलबाळं नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दादेभाई याना शेख महेबुब ऊर्फ बाशा हा मुलगा होता तो मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेख महेबुब यांना दोन मुले व दोन मुली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, बुऱ्हाण हा त्याच्या आईच्या पहिल्या नवऱ्यापासून जन्मलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, बुऱ्हाणच्या जन्मानंतर त्याच्या आईने ईस्माईलसोबत राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, बुऱ्हाणच्या आईपासून ईस्माईलला कोणतेही मुलबाळं झाले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील वंशावळ हे बुऱ्हाणचे वंशावळ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादींचे प्रतिवादींशी कोणतेही नातेसंबंध नाही.

२. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील मिळकती या खरेदी केलेल्या मिळकती आहेत, एकत्र कुटूंबाच्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पाचाबी, जवजे सय्यद यांचेकडून दादेभाईने १३३० फसलीला मौजे बेवनाळ येथील सर्वे नं.५२ मधील ६ एकर १२ गुंठे जमीन रु.११९९/- ला रजिस्टर खरेदी खताआधारे खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, तसेच पाचाबी, जवजे सय्यद यांचेकडून दादेभाईने मौजे बेवनाळ येथील सर्वे नं.५२ मधील ३ बीगे ६ गुंठे जमीन १३३२ फसलीला रजिस्टर खरेदी खताआधारे खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, तसेच पाचाबी, जवजे सय्यद यांचेकडून दादेभाईने मौजे बेवनाळ येथील सर्वे नं.५२ मधील ३ एकर ६ गुंठे जमीन १३३५ फसलीला रजिस्टर खरेदी खताआधारे खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तिनही खरेदी खतावर माझे आजोबा बुऱ्हाण हे साक्षीदार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्या तिनही खरेदी खतावर दादेभाईनेच पैसे दिल्याचा उल्लेख आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर सर्वे नं५२ चा सर्वे नं.६८ झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरण योजनेमध्ये सर्वे नं.६८ चे गट नं.५४ व ५५ असे पडले. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.५४ ला प्रतिवादी क्र.१ चे नाव व गट क्र.५५ ला प्रतिवादी क्र.२ चे नाव लागले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजपावेतो आम्ही एकत्रीकरण योजनेला आव्हान दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरण योजनेविरुध्द केलेल्या अपीलाच्या प्रती मी अभिलेखात दाखल केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या गट क्र.५४ पुर्वेस सरकारी रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, पश्चीमेला गट क्र.५५ नसून जिलानी हैदर शेख यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दक्षिणेला मुजावर व शेख यांची जमीन नसून अमीन नाजम धानुरे व उस्मान अमीन धानुरे यांच्या जमिनी आहेत. साक्षीदार सांगतो की, त्यांचे आडनाव शेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, अमीन व उस्मान यांचे आडनाव शेख असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.५४ च्या उत्तरेला गट क्र.५५ आहे.

४. सदरचा दावा हा मालकी जाहीर करुन मिळणेकरीता केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाद मिळकतीसंदर्भात यापुर्वीही नि. दिवाणी दावा क्र.१९१/१९८० दाखल झालेला होता.

सदर दावा हा सर्वे नं.६८ मधील १३ एकर ६७ गुंठे जमिनीपैकी पुर्वेकडील अर्धा हिश्याचा ताबा मिळण्याकरीता होता. सदर दावा माझ्या वडीलांनी प्रतिवादींविरुध्द केला होता. दावा प्रलंबित असताना माझे वडील मयत झाल्यानंतर आम्ही सदर दावा चालवला. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा २९/११/१९९७ रोजी खर्चासह खारीज झाला होता व आम्ही त्याविरुध्द जिल्हा न्यायालयात नियमित अपील क्र.९०/९८ दाखल केले होते व सदरचे अपील ०५/०८/२००५ रोजी खारीज झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपील बोर्डावर घेण्यासाठी किरकोळ अर्ज क्र.३७/२००५ दाखल केला होता व तोही खारीज झाला. हे म्हणणे खरे आहे की, त्याविरुध्द आम्ही रिट क्र.४१०/२०१० मा. उच्च न्यायालयात दाखल केले होते, व तेही खारीज झाला व त्यानंतर आम्ही दुसरे अपील क्र.१११३७/२०१५ दाखल केले होते. सदर अपील प्रलंबीत आहे.

५. मला दोन भाऊ व एक बहीण आहे. माझा सावत्र भाऊ बाशु मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा दुसरा भाऊ व बहीण पक्षकार नाही. मयत भाऊ बाशुला मुले आहेत, तेही दाव्यात पक्षकार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या मिळकतीविरुध्द मी अपील केले होते त्याच मिळकतीसंदर्भात मी दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पहिला कब्जे मागणीचा दावा खारीज झाल्यानंतर मला नंतर दुसरा मालकी जाहीर होऊन मिळणेचा दावा दाखल करता येत नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी जमिनीतील उत्पन्नाचा हिस्सा आम्हाला द्यायचा होता हा शपथपत्र परिच्छेद क्र.१ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जमिनीचे उत्पन्न प्रतिवादींनी मला द्यायचे होते हे पहिल्यांदा मी नमूद केले आहे. प्रतिवादींनी आम्हाला जमिनीतील उत्पन्न द्यावा असा कोणताही लेखी करार आमच्यामध्ये झालेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.३ हा खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमीन खरेदी घेतल्यापासून दादेभाई व त्यांच्या मुलांच्या नावे व त्यांच्या ताब्यात आजतागायत जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी दादेभाई ईस्माइल शेख यांचे नाव खरेदी खताआधारे नोंद झाले आहे, पट्टेदार म्हणून नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या नोंदी या वारसाच्या आधारे आलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचा दावा मुदतबाह्य दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने मी खोटा दावा दाखल केला आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादींमध्ये अंकुलगा सय्यद येथील जमिनीसंदर्भात वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाद सुप्रिम कोर्टापर्यंत गेला होता व त्याचा निकाल प्रतिवादींच्या बाजुने लागला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनीवरही मी याचप्रकारे खोटा हक्क सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही कारण नसताना सदरचा खोटा दावा दाखल केला आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीची आई माझी सावत्र बहीण आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादींचे वैयक्तीक कोणतेही नातेसंबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींची

जमीन गिळकृंत करण्याच्या वाईट हेतुने मी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून सदर जमीन गिळकृंत करण्याच्या वाईट हेतुने आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.२६/११/२०२४

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.